स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६//२०२२ दिनांक :-१७ फेब्रुवारी, २०२३

# बातमी

जळगाव दि.१७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता बृहत आराखड्याच्या अनुषंगाने समाजातील विविध घटक, पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ यांच्याकडून विद्यापीठाने सूचना मागविण्यात आल्या आहेत.

विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता बृहत आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केली आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या व संगणकीकरणाच्या काळात विद्यापीठ अधिक्षेत्रातील जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील युवकांना प्रल्भ नागरिक बनविण्यासाठी तसेच त्यांचे भविष्यातील जीवन आर्थिक व व्यावसायिक प्रगतीशील होण्यासाठी सेवारहित व न्यूनविकास क्षेत्रांच्या गरजांचा योग्य तो विचार करुन उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वसमावेशक, समन्यायी वाटप होण्याच्या दृष्टिने व युवती/युवकांना अधिक दर्जेदार, गुणवत्तापूर्ण तसेच व्यावसाभिमुख उच्च शिक्षणाचे कोणेते नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरु करण अपेक्षित आहे. त्यासाठी सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे. विद्यापीठाचा वर्ष २०१९-२४ या पाच वर्षाचा आराखडा विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी नव्याने तयार करावयाच्या बृहत आराखडा करीता सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या मेलवर २८ फेब्रुवारी पर्यंत पाठवाव्यात असे आवाहन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले आहे.

---

# बातमी क्र. २

जळगाव दि.१७ (प्रतिनिधी) छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने रविवार दि. १९ फेब्रुवारी रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. प्रमोद हिरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात सकाळी ११ वाजता डॉ. हिरे यांचे व्याख्यान होणार असून कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी असतील. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सू.पगारे, केंद्राचे समन्वयक डॉ.अजय पाटील उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानाच्या आधी सकाळी ७ वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारापासून प्रशासकीय इमारतीपर्यंत शिवप्रतिमेची शोभायात्रा काढली जाणार आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी